**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA**
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र**
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९००० संलग्नता टी-२ विभाग दूरध्वनी -०२३१ - २६०९०९१
संचालक, बी.सी.यु.डी. कार्यालय, दूरध्वनी : (थेट) ०२३१ - २६०९०७०
Estd.1962
NAAC ' A ' Grade


संदर्भ क्र./संलग्नता/टी-२/ ११४ दि. 20 AUG 2018

**तातडीचे स्मरणपत्र**

**प्रति,**
**मा. प्राचार्य/संचालक व संस्था अध्यक्ष/सचिव,**
**विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये (पांरपारिक/व्यावसायिक),**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

**विषय -** राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत आयोजित कार्यशाळेस उपस्थित राहणेबाबत.

**संदर्भ -** या कार्यालयाचे संदर्भ क्र./संलग्नता/टी-२ /१०७, दि.१४/०८/२०१८ रोजीचे सर्व संलग्न महाविद्यालयांना पाठविलेले पत्र.

**महोदय/महोदया,**

आपणांस विदित आहेच की, उच्च शिक्षण संचालनालयाकडून राबविणाऱ्यात येणाऱ्या दि. ०७/१०/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये राजर्षी शाहू शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांसाठी लाभाची व्याप्ती वाढविण्यात आलेली आहे. तसेच संदर्भ क्र. ७२ वरील दि. ३१/०३/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीसाठी पालकांची उत्पन्न मर्यादा रु. ६,००,०००/- वरून रू ८,००,०००/- करण्यात आलेली आहे.

तथापि, अद्यापही काही महाविद्यालये सदर योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे करत नसल्याच्या तक्रारी विद्यापीठ प्रशासनास प्राप्त झाल्या आहेत. सबब, सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने तसेच विद्यार्थी व महाविद्यालय यांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करणेसाठी **मंगळवार, दि.२१/०८/२०१८** रोजी दुपारी ठिक ०३.३० वाजता वि. स. खांडेकर भाषा भवन, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे मा.कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली तसेच मा. विभागीय सहसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांच्या उपस्थितीत प्राचार्य व संस्थाचालक **(शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित व स्वायत्त महाविद्यालये)** यांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली आहे. तरी ही बैठक महत्त्वाची असल्याने आपण या बैठकीस न चुकता उपस्थित रहाणेबाबत आपणास उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात आले आहेच.

तसेच सदर योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने महाविद्यालयांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि.२०/०८/२०१८ रोजी दुपारी ०२.०० वाजेपर्यंत विद्यापीठ कार्यालयास सॉफ्ट कॉपी व हार्ड कॉपीमध्ये सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. तथापि, अद्यापही बहुतांश महाविद्यालयांनी सदरचा अहवाल सादर केलेला नाही. **तरी, ज्या महाविद्यालयांनी सदरचा अहवाल अद्यापही सादर केलेला नाही त्यांनी सदरचा अहवाल (सॉफ्ट कॉपी) आजच या विभागाच्या affiliation.t2@unishivaji.ac.in या ई-मेलआयडीवर MS Excel मध्ये तयार करून पाठवावा. तसेच उद्या दि.२१/०८/२०१८ रोजीच्या बैठकीस येताना सदर अहवालाची हार्ड कॉपी सोबत आणणे आवश्यक आहे, याची नोंद घ्यावी.**

टिप : १. सदर बैठकीकरिता संबंधितांना विद्यापीठाचा प्रवास भत्ता व दैनंदिन भत्ता देय असणार नाही.
२. सदर बैठकीकरिता प्राचार्य व संस्थाचालक यांनी स्वतः उपस्थित राहावे, प्रतिनिधी पाठवू नयेत.

कळावे,

आपला,

(डॉ. विलास डी. नांदवडेकर)
कुलसचिव

**प्रत :**
१. मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, राजाराम महाविद्यालय परिसर, कोल्हापूर.
२. मा. कुलगुरू / मा. प्र-कुलगुरू यांचे कार्यालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
३. सुरक्षा विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
४. जनसंपर्क कार्यालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.